# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५. **दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४ / ६५ / ६९
**फॅक्स :** ०२२-२२१६ ३९७६ **ई-मेल :** mercindia@mercindia.org.in **वेबसाईट :** www. mercindia.org.in

**मविनिआ**


दि. २४ डिसेंबर, २०१०

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० च्या विनियम ९.७ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात द्यावयाच्या शुल्क आणि आकारांच्या निश्चितीकरणाबाबतच्या सन २०१० च्या प्रकरण क्र. ७४ मध्ये, आयोग स्वतः काढीत असलेल्या आदेशावर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत.**

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१, ६६, ८६(१)(इ) आणि १८१ खाली प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या संदर्भात समर्थ करण्याऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, आयोगाने नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन आणि त्याच्या पालनासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० केले आहेत. विनियमांतर्गत असलेली कामे पार पाडण्यासाठी राज्य एजन्सीला (अभिकरण) द्यावयाचे शुल्क आणि आकार निश्चित करण्याचे अधिकार वर उल्लेख केलेल्या विनियमांच्या विनियम ९.७ अंतर्गत आयोगाला आहेत.

सदर विनियमांना अनुसरून, महाराष्ट्रात द्यावे लागणारे शुल्क आणि आकार निश्चित करण्याच्या प्रकरणी आयोगाने स्वतः प्रारुप आदेश तयार केला आहे, जो आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

सदर प्रारुप आदेशात उल्लेख केलेले शुल्क आणि आकार केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या शुल्क आणि आकारांइतकेच ठेवण्यात आले आहेत आणि नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र पद्धतीखाली नूतनशील ऊर्जा प्रकल्पांना अधिस्वीकृती देण्यासाठी आणि नोंदणीस शिफारस करण्यासाठी सदर शुल्क आणि आकार महाराष्ट्र राज्यातील नूतनशील ऊर्जा निर्मात्यांकडून, आयोगाने पदनिर्देशित केलेल्या राज्य अभिकरणाला म्हणजेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाला (मेडा), देय राहतील.

वरील प्रारुप आदेशावर आयोग, जनता आणि अन्य संबंधितांकडून सूचना/हरकती मागवित आहे, या सूचना/हरकती आयोगाचे सचिव यांना, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ येथे, प्रत्यक्ष किंवा पोस्टाने किंवा फॅक्स/ई-मेल द्वारे mercindia@mercindia.org.in या पत्त्यावर **गुरुवार, दि. १३ जानेवारी, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

सही/-

**(के. एन. खवारे)**

**सचिव, मविनिआ**

ठिकाणः मुंबई

दिनांकः २४ डिसेंबर, २०१०